# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ११/०३/२०२० रोजी (का.प.क्र.०९) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक ११/०३/२०२० रोजी दि.०९/०३/२०२० ची तहकुब (का.प.क्र.०९) मा.सभापती सौ.जयश्री सुरेंद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी १२:१५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.उपआयुक्त,श्री.रविंद्र निकम, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| ०१. | स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ०२. | स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ०३. | स.स.श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| ०४. | स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान |
| ०५. | स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर |
| ०६. | स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशिद |
| ०७. | स.स.श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| ०८. | स.स.श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ०९. | स.स.श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |

श्री.गजानन बारवाल : मागच्या मिटींगमध्ये जो विषय झाला होता त्याचे संबंधीत अधिकारी उपस्थित का नाही याची माहिती देण्यात यावी. विषयामध्ये प्रशासनाचे नेमके म्हणणे काय आहे याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : सदर संचिका शहर अभियंता यांच्याकडे त्यांनी याबाबत खुलासा करण्यात यावे. संचिकेचे काय झाले ते सांगण्यात यावे.

श्री.राजेंद्र जंजाळ : मागच्या बैठकीमध्ये ज्या विषयामुळे सभा तहकुब करण्यात आली होती त्या विषयाच्या अनुषंगाने सभागृहामध्ये अधिकाऱ्यांमार्फत सांगण्यात आले होते की, जी चर्चा सभागृहामध्ये चालु आहे तो विषय या विषयपत्रिकेमधला नाही त्याबाबत माहिती देता येणार नाही. परंतु महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण तीन मध्ये महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती व अन्य संस्था यांचे कामकाज (४३) मधील पोट कलम (३) मध्ये महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने आपली कर्तव्ये पार पाडत असताना केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल महानगरपालिकेच्या ज्या कोणत्याही सभेमध्ये किंवा सभांमध्ये चर्चा चालू असेल त्या सभेमध्ये किंवा सभांमध्ये अशा अधिकाऱ्यास उपस्थित राहण्याविषयी फर्माविता येईल, अशा रीतीने कोणत्याही अधिकाऱ्यास अशा कोणत्याही सभेत उपस्थित राहण्याविषयी फर्मावण्यास येईल तेव्हा त्याने केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल वस्तुस्थितीसंबंधी निवेदन किंवा स्पष्टीकरण करण्याविषयी किंवा अशा गोष्टींसंबंधी त्याच्याजवळ असलेली जी माहिती महानगरपालिकेस आवश्यक वाटेल ती पुरविण्याविषयी त्याला फर्मावता येईल. म्हणजे त्यांना आदेश देण्याचे अधिकार आपल्याला आहे. मग जी खोटी माहिती त्यांनी या सभागृहामध्ये सादर केली त्या अधिकाऱ्यावर कोणत्या प्रकारची कार्यवाही करणार आहोत. आवश्यक ती माहिती पुरवण्यात आलेली नाही आणि आज ते अधिकारी सभेला सुध्दा हजर नाहीत. महापालिकेचे स्थायी समितीचे सभापती म्हणुन आपण काय कार्यवाही करणार आहे ते स्पष्ट करण्यात यावे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निविदे प्रक्रियेमध्ये सुध्दा विलंब होतो, स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाबद्दल विलंब होतो कोणाकडुन होता माहित नाही. अधिकारी सांगतात की मी

कर्मचारी संघटनेचा अध्यक्ष आहे. कर्मचाऱ्याच्या न्याय व हक्कासाठी तुम्ही भांडले पाहिजे ही तुमची भुमिका योग्य आहे. त्याबद्दल आमच्या मनामध्ये दुमत नाही. परंतु अशा पध्दतीने सभागृहामध्ये खोटी माहिती देणे चुकीचे आहे. मा.आयुक्तांकडुन फाईलच्या बाबतीत खुलासा घेण्यात यावा. त्या फाईलमध्ये काही गोपनिय असेल तर ते सभागृहामध्ये सांगुन टाकावे. प्राधिकृत केलेल्या मा.आयुक्तांकडुन माहिती विचारण्यात यावी. जर सभागृहामध्ये फाईल आणता येत नसेल किंवा अधिकाऱ्याला आणायची नसेल व कोणत्या नियमाने दाखवु शकत नाही, कोणत्या नियम व कायद्याने दाखवता येत नाही ते सांगण्यात यावे. याबाबत कठोर भुमिका घेण्याची आवश्यकता आहे. यामध्ये जे-जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे.

श्री.गजानन बारवाल : या विषयामध्ये प्रशासनाने कोणतीही आडचण निर्माण न करता सहकार्य करायला पाहिजे होते. कोणत्या नियमाने माहिती देता येत नाही ते स्पष्ट करायला पाहिजे. जो प्रश्न उपस्थित झाला आहे तो फक्त वार्डापुरता मर्यादित नाही. त्यामुळे यात गंभीर दखल घेण्यात यावी. त्वरित याबाबतची सर्व माहिती सदस्यांना द्यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : महानगरपालिकेच्या प्रत्येक गोष्टीची माहिती सभागृहात मागितली तर त्या-त्या अधिकाऱ्यांनी दिली पाहिजे. जर अधिकारी माहिती देत नसतील तर त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

मा.उपआयुक्त : महापालिका आयुक्तांकडुन परवानगी घेऊन तात्काळ संचिका सभागृहात सादर करण्यात येईल.

श्री.राजेंद्र जंजाळ : आताच मी जी कलम वाचून दाखवले त्यामध्ये कुठेच लिहिलेले नाहि की, त्याला मा.आयुक्तांची मान्यता घेतली पाहिजे. आपण प्राधिकृत केलेले आयुक्त आहात, त्या अधिकाराच्या अनुषंगाने सभापती मॅडम जे आदेश करतील त्याचे पालन करावे. पुर्ण जबाबदारीने खुलासा करण्यात यावा.

मा.उपआयुक्त : मा.सभापती जे आदेश देतील त्याचे तंतोतंत पालन करण्यात येईल.

मा.सभापती : हिंदुहृदय सम्राट मा.बाळासाहेब ठाकरे यांचे एमजीएम येथील स्मृतीवन करण्याच्या संदर्भातील संचिका आज दि.११/०३/२०२० रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये सादर करण्याबाबत दिनांक ०९/०३/२०२० रोजी तहकूब करण्यांत आलेल्या सभेमध्ये आदेशित करण्यात आले होते. तसेच या संदर्भात मा.आयुक्त महोदय व शहर अभियंता यांना जा.क्र.मनपा/सभापती-स्था.स./५७/२०२०, दि.०९/०३/२०२० अन्वये पत्र देऊन सूचीतही करण्यात आले होते. तथापी आज रोजी सदर कामाची संचिका सभागृहात सादर झालेली नाही. करीता या कामामध्ये दप्तर दिरंगाई झाल्याचे सभागृहाचे मत झाले असून, मा.आयुक्त महोदय यांना आदेशित करण्यांत येते की, त्यांनी या कामामध्ये ज्या-ज्या अधिकारी यांनी या संचिकेनुसार कार्यवाही करण्यास विलंब केला, त्यांचेविरुध्द दप्तर दिरंगाई केल्याबद्दल तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाही पासून येणाऱ्या स्थायी समिती सभेस माहिती द्यावी. तसेच आज दिनांक ११/०३/२०२० (दि.०९/०३/२०२० रोजीची तहकूब सभा (का.प.क्र.०९) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांतास स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

या बरोबरच मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद